# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.11.2024** **वारःसोमवार**

---

१. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ब्राझीलमध्ये जी – २० शिखर परिषदेमध्ये सहभागी होणार,

२. महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणूक प्रचाराचा आज अखेरचा दिवस, येत्या बुधवारी होणार मतदान,

३.कैंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज मणिपूरमधील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेणार,

४.भारताच्या पहिल्या लांब पल्ल्याच्या हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी,

आणि

५. आशिया चषक महिला हॉकी स्पर्धेत भारताची जपानवर मात.

**<u>मोदी ब्राझील</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या नायजेरिया, ब्राझील आणि गुयाना या तीन देशांच्या दौऱ्यावर असून आज सकाळी या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात ते ब्राझीलला पोहोचले आहेत. तिथं मोदी यांचं भारतीय जनसमुदायानं उत्साहात जोरदार स्वागत केलं. पंतप्रधान आज ब्राझीलमधील रिओ डी जानिरो शहरात होणाऱ्या जी – २० शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत. शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर मोदी यांच्या जागतिक नेत्यांसोबत स्वतंत्र बैठकाही होणार आहेत. मोदी यांच्या बरोबर शिखर परिषदेमध्ये सहभागी होणाऱ्या नेत्यांमध्ये अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांचा समावेश आहे. त्यांच्यासह इतर जागतिक नेत्याबरोबर मोदी जागतिक महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा करतील. त्याचप्रमाणे गेल्या वर्षी नवी दिल्ली इथं झालेल्या जी – २० शिखर परिषदेतील घोषणापत्रातील विषयांचा पाठपुरावाही करतील. 'एका न्यायसुसंगत आणि शाश्वत ग्रहाची आणि पर्यायांनं जगाची निर्मिती' असं यंदाच्या जी – २० शिखर परिषदेचं सूत्र आहे. या परिषदेत ब्राझील सर्वसमावेशकता, गरिबी, शाश्वत विकास आणि जागतिक प्रशासन संस्थांच्या सुधारणा या मुद्द्यांना प्राधान्य देईल.

जी-20

दरम्यान, ब्राझीलमध्ये सुरू होणाऱ्या जी-20 परिषदेत भारतात गेल्या वर्षी झालेल्या जी-20 परिषदेत अपुरं राहिलेलं काम पूर्ण होईल, अशी अपेक्षा भारताचे शेर्पा अमिताभ कांत यांनी व्यक्त केली आहे. गरिबी आणि उपासमार यांच्याविरुद्धचा लढा, महिलांचं सक्षमीकरण, सर्वसमावेशक विकास या विषयांवर गेल्या जी -20 परिषदेत चर्चा झाली असली तरीही त्यावर सर्व देशांचं एकमत झालं नव्हतं. या चर्चा यावेळी पुढे सुरू

राहतील. या मुद्द्यांवर सर्व देशांचा सहभाग आवश्यक असल्याचं कांत यांनी आकाशवाणीला सांगितलं. ब्राझीलमधल्या जी 20 परिषदेचं यश सर्व देशांच्या सहमतीवर अवलंबून असल्याचं ते म्हणाले.

**<u>पीएम</u>**

तत्पूर्वी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नायजेरियाचे अध्यक्ष बोला अहमद तिनुबू यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. पंतप्रधान मोदी यांना 'ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर' हा नायजेरियातला सर्वोच्च सन्मान काल प्रदान करण्यात आला. "हा केवळ व्यक्तिशः आपला सन्मान नाही, तर सर्व भारतीयांचा सन्मान आहे", अशी भावना पंतप्रधान मोदी यांनी यावेळी व्यक्त केली. अबुजा इथं काल संध्याकाळी त्यांनी भारतीय समुदायाला संबोधित केलं. नायजेरियाच्या अर्थव्यवस्थेत भारतीयांचं मोठं योगदान असल्याचं मोदी म्हणाले.

**<u>निवडणूक</u>**

महाराष्ट्रात एका टप्प्यात आणि झारखंडमध्ये होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील विधानसभा निवडणुकांसाठी प्रचाराचा आज अखेरचा दिवस आहे. येत्या २० तारखेला होणाऱ्या मतदानासाठी दोन्ही राज्यांमध्ये सर्वपक्षीय नेत्यांच्या झंझावाती प्रचारसभा, दौरे, रॅली, मतदारांच्या भेटीगाठी यामुळे वातावरण गेले काही दिवस ढवळून निघालं आहे. दोन्ही ठिकाणी आज संध्याकाळी सहा वाजता प्रचार संपेल.

**<u>यंत्रणासज्ज</u>**

दरम्यान, महाराष्ट्रात 288 विधानसभा मतदारसंघांमध्ये आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी येत्या बुधवारी, 20 नोव्हेंबर रोजी मतदान होत असून राज्यातील 9 कोटी 70 लाख 25 हजार 119 मतदारांसाठी 1 लाख 427 मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान करता येणार आहे. संवेदनशील मतदान केंद्रांवर केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. प्रशासनाकडून निवडणुकीची संपूर्ण तयारी झाली असून राज्यातील मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करण्याचं आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे. गडचिरोली जिल्ह्यातील संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर वायुसेनेच्या हेलिकॉप्टरच्या मदतीने मतदान पथकं रवाना होत आहेत.

**<u>झारखंड</u>**

दरम्यान, झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीचा प्रचार संपल्यानंतर खासगी वाहनांवर बॅनर वापरण्यास निवडणूक आयोगानं बंदी घातली आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यास येईल, असं मुख्य निवडणूक अधिकारी के. रवी कुमार यांनी सांगितलं. झारखंडमध्ये 14 हजार 218 मतदान केंद्र असून 31 मतदान संघांमध्ये आज दुपारी 4 वाजता आणि उर्वरित मतदान संघांमध्ये सायंकाळी 5 वाजता प्रचार संपणार आहे. दरम्यान, विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून राज्याच्या विविध भागातून 196 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. आचारसंहितेचं उल्लंघन केल्याप्रकरणी आतापर्यंत 85 प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात आले आहेत.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे..

**<u>मणिपूर</u>**

मणिपूरमधील परिस्थिती अद्यापही अशांत आहे. आसाममधील कछार जिल्ह्यात बराक नदीच्या पात्रात काल एका महिलेचा मृतदेह आढळला. गेल्या सोमवारी इथं कुकी बंडखोरांनी सहा लोकांचं अपहरण केलं होतं. त्यापैकीच ही महिला असावी, असं पोलिसांनी म्हटलं आहे. त्या सहा जणांपैकी तीन जणांचे मृतदेह जिरिबाम इथल्या बोरोबेकरा भागात आढळले होते. त्यानंतर मणिपूरच्या सर्व भागात नागरिकांनी जोरदार निदर्शनं केली होती. त्यानंतर राज्याच्या गृहमंत्रालयानं खबरदारीचा उपाय म्हणून जिरीबाम आणि फेरज़ॉल जिल्ह्यांमधील इंटरनेट सेवा दोन दिवसांसाठी बंद ठेवली होती. काल राज्याच्या दुर्गम भागातील पांच जिल्हयानसह एकंदर सात जिल्ह्यांमधील इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे.

**<u>शहा बैठक</u>**

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि मणिपूरमधील स्थितीचा आढावा घेतला. शहा आजही नवी दिल्ली इथं स्वतंत्र बैठक घेणार असून एकंदर सुरक्षेबाबत चर्चा करणार आहेत. काल मणिपूरमध्ये पुन्हा शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टिनं आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश गृह मंत्रालयाकडून देण्यात आले होते. दोन्ही बाजूंनी झालेल्या हिंसाचारात अनेक जण मृत्युमुखी पडले असून सामाजिक स्वास्थ्य बिघडले आहे. यामध्ये सामील असणाऱ्या दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असं गृह मंत्रालयानं प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<u>DRDO</u>**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात DRDO नं भारताच्या पहिल्या लांब पल्ल्याच्या हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली. ओडिशाच्या किनारपट्टीवरील डॉ APJ अब्दुल कलाम बेटावरून शनिवारी ही चाचणी घेण्यात आली. 1,500 किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरील लक्ष्याचा अचूक वेध घेण्यासाठी हे हायपरसॉनिक क्षेपणास्त्र तयार करण्यात आलं आहे. या यशस्वी चाचणीमुळे प्रगत लष्करी तंत्रज्ञानाची क्षमता असलेल्या राष्ट्रांच्या गटात भारताला स्थान मिळालं आहे,असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>शेख हसीना</u>**

गेल्या ऑगस्टमध्ये सरकार पडल्यानंतर सध्या भारतात आश्रय घेतलेल्या बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या प्रत्यर्पणाची मागणी बांगला देशमधील अंतरिम सरकार करेल, असं बांगलादेशचे विद्यमान मुख्य सल्लागार मुहम्मद युनूस यांनी म्हटलं आहे. इथल्या अंतरिम सरकारचे शंभर दिवस पूर्ण झाल्यानिमित्त ते देशाला संबोधित करत होते. आपलं सरकार सर्व नागरिकांच्या सुरक्षेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे, असंही युनूस म्हणाले. गेल्या ८ ऑगस्ट रोजी पदभार स्वीकारलेल्या युनूस यांनी दावा केला की हसीन सरकारच्या विरोधातील आंदोलनादरम्यान विद्यार्थी आणि कामगारांसह सुमारे पंधराशे लोक मारले गेले असून १९ हजार ९३१ जण जखमी झाले होते. विवादास्पद नोकरी कोटा

प्रणालीवर सरकारच्या विरोधात देशात मोठ्या प्रमाणात निदर्शनं  सुरू झाल्यानंतर 77 वर्षीय हसीना यांनी राजीनामा देऊन भारतात आश्रय घेतला आहे.

**बद्रीनाथ**

उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यातील श्री बद्रीनाथ धामचे दरवाजे कडक हिवाळ्याच्या पार्श्वभूमीवर काल रात्री नऊ वाजता बंद करण्यात आले. त्यानिमित्त काल बद्रीनाथ मंदिर १५ क्विंटल झेंडूच्या फुलांनी सजवण्यात आले होते. मंदिराच्या सिंहद्वार संकुलात गढवाल स्काऊट बँडतर्फे वंदन करण्यात आलं. त्या  भक्तिमय सुरांनी संपूर्ण बद्रीनाथ परिसर दुमदुमून गेला होता.

त्यापूर्वी, शनिवारी चमोलीचे जिल्हा दंडाधिकारी संदीप तिवारी यांनी बद्रीनाथ धामला भेट देऊन मंदिर बंद करण्याच्या व्यवस्थेचा आढावा घेतला. यासोबतच त्यांनी संपूर्ण प्रवासादरम्यान भाविकांच्या सुरक्षा व्यवस्थेचं काम पाहणाऱ्या  बद्रीनाथ मंदिराच्या आवारातील 'पर्यावरण' मित्र, पोलिस दल, आयटीबीपी आणि मंदिर समितीचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं कौतुक केलं. वैदिक विधी आणि धार्मिक परंपरांनुसार मंदिराचे  दरवाजे बंद करण्यात आले.

**इफफी**

प्रसिद्ध चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची 2024च्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात 'इफ्फी'साठी आंतरराष्ट्रीय ज्युरीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. "चित्रपट हा काळासोबत  सतत विकसित होत आहे आणि या उत्क्रांतीचा साक्षीदार होण्यासाठी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हे एक चांगलं व्यासपीठ आहे; त्याचा एक भाग होण्याची  मला  मिळालेली संधी हा माझा सन्मान आहे", अशी प्रतिक्रिया गोवारीकर यांनी  व्यक्त केली.

**हॉकी**

बिहारमध्ये सुरू असलेल्या महिलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत काल भारताने जपानवर ३-० अशी मात करत आपली विजयी घोडदौड कायम ठेवली. नवनीत कौर आणि दीपिका कुमारी यांनी चमकदार खेळी करत भारताला विजय मिळवून दिला. या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज  पुन्हा भारताच्या संघाची लढत जपानशी होणार आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.